# सोलापूर विद्यापीठ

सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website: http://su.digitaluniversity.ac

# SOLAPUR UNIVERSITY

Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-124
Email : bcudsu@gmail.com


**Ref. No. : SUS/BCUD/PGBUTR/2015-16/** 1027 **Date:** 21 JAN 2016

**परीपत्रक (स्पष्टीकरण)**

प्रति,

**मा. प्राचार्य / संचालक**
सर्व संलग्नित एम.फिल./ पीएच.डी. अभ्यासक्रम संशोधन सुविधा केंद्र/ विद्यापीठ संकुल
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय** - पीएच.डी. अभ्यासक्रमाचे सहामाही प्रगती अहवाल व शुल्काबाबत.

**संदर्भ** - १) दि. १८ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २ (३) अन्वये
२) प्रस्तुत विद्यापीठ परीपत्रक क्र. SUS/BCUD/PGBUTR/२०१५-१६/७८५२ दि. ८-१२-२०१५

महोदय,

या कार्यालयाचे दि. ८-१२-२०१५ रोजीच्या परीपत्रकान्वये पीएच.डी. अभ्यासक्रमाचे सहामाही प्रगती अहवाल व शुल्क विहित वेळेत न भरल्यास सुधारीत दंडाची आकारणी करण्यात आल्याचे सर्व संबंधितांना कळविले आहे. या परीपत्रकासंदर्भात विद्यार्थी / संशोधन केंद्र यांचेकडून प्राप्त शंकांचा विचार करुन आदेशान्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

१) संदर्भ क्र. २ मधील दि. ८ डिसेंबर २०१५ च्या परीपत्रकामधील सुधारीत दंडाची अंमलबजावणी पीएच.डी. अभ्यासक्रमास २००५-०६ पासून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांसाठी दि. १ मार्च २०१६ पासून करण्यात येईल.

२) संशोधक विद्यार्थ्यांनी / संबंधित संशोधन केंद्रप्रमुख तथा प्राचार्य यांनी त्यांचेकडील प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रलंबीत सहामाही प्रगती अहवाल व वार्षिक शुल्क जुन्या नियमानुसार दि. २९ फेब्रुवारी २०१६ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करावे. तद्नंतर कोणत्याही सबबीवर मुदतवाढ दिली जाणार नाही.

३) दि. १ मार्च २०१६ पासून सुधारीत दंडाची अंमलबजावणी पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना (२०१५ पूर्वी प्रवेशितसह) व सर्व प्रलंबीत सहामाही प्रगती अहवाल व शुल्कास देखील लागू राहील.

४) वरील बदलाशिवाय संशोधन केंद्राने त्यांच्याकडे विद्यार्थ्यांकडून जमा झालेले नियमीत शुल्क दि. ५ फेब्रुवारी / दि. ५ ऑगस्ट पर्यंत विद्यापीठात जमा करण्याची तरतूद पूर्वीप्रमाणेच लागू राहील त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. असे प्राप्त शुल्क मुदतीत विद्यापीठात जमा न केलेस दि. ८ डिसेंबर २०१५ चे परीपत्रकानुसार कार्यवाही केली जाईल.

संबंधित विद्यापीठ संकुल संचालक व महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सदर बदलाची गांभीर्याने नोंद घेवून आपापल्या विद्यार्थ्यांना पत्र / ईमेल इ. मार्फत सूचना दयावी.

सदरचे परीपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर एम.फिल./पीएच.डी. या लिंकवर उपलब्ध आहे.
कळावे.

आपला विश्वासू,

**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

E:\shirish\PGBUTR\circular & Norms\General Shirish 2.doc